**आजचा सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.

दैनिक **अक्षराज** — अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध — Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी... कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १५८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२० जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# महापौर पदासाठी भाजपाचा नवा फॉर्म्यूला, एकनाथ शिंदेंचं टेन्शन वाढलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** राज्यात एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी लागला आहे. हा निकाल लागून आता तीन दिवस उलटले असले तरीही राजकीय घडामोडी थांबलेल्या नाहीत.



निवडणुकीतील विजयानंतर आता महायुतीमध्ये महापौरपदासाठी रस्सीखेच चालू झाली आहे. ज्या महापालिकेत एकनाथ शिंदे यांचे नगरसेवक जास्त आहेत, तिथे आमचाच महापौर झाल पाहिजे, यासाठी एकनाथ शिंदे यांच्याकडून प्रयत्न केले जात आहेत. मुंबई महापालिकेत मात्र शिंदे यांची शिवसेना अडीच वर्षांसाठी महापौरपद मागत असल्याचे बोलले जात आहे. असे असतानाच आता भाजपाने एकनाथ शिंदे यांची चांगलीच कोंडी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार शिंदे यांची मुंबईतील भूमिका पाहता भाजपाने ठाण्यामध्ये थेट महापौरपदावर दावा सांगितला आहे. आता या नव्या मागणीमुळे शिंदे अडकीत्त्यात सापडल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

**ठाण्यात नेमकं काय घडतंय?**

नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत महायुतीला ठाण्यात मोठे यश मिळाले आहे. येथे एकनाथ शिंदे यांची शिवसेना सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. या पक्षाचे ठाण्यात ७१ नगरसेवक निवडून आले आहेत. भाजपाला फक्त २८ जागांवर जिंकता आलेले आहे. असे असूनही महायुतीचा धर्म असे म्हणत भाजपा ठाण्यात अडीच वर्षांसाठी महापौरपद मागत आहे. ठाण्यात एकूण १३१ जागांसाठी निवडणूक झाली होती. शिंदे यांच्या विजयी उमेदवारांचा आकडा पाहता ते ठाण्यात आपला महापौर सहज बसवू शकतात. असे असले तरी शिंदे यांची मुंबईत कोंडी व्हावी यासाठी भाजपाने हा डाव टाकल्याचे बोलले जात आहे.

**एकनाथ शिंदे नेमकं काय करणार?**

एकनाथ शिंदे हे मुंबईत अडीच वर्षांसाठी महापौरपद मागत असल्याचे बोलले जात आहे. त्यानंतर आता महायुती असल्यामुळे भाजपा ठाण्यातही सत्तेत भागिदारी मागत आहे. त्यामुळेच आता एकनाथ शिंदे नेमकं काय करणार? मुंबईत सत्तेत वाटा हवा असेल तर बहुमत असूनही ते ठाण्यात भाजपाला सत्तेत सहभागी करून घेणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच दावोसहून परत येणार आहेत. त्यानंतर घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे.

## ओबीसी, महिला, ओपन की; मंत्रालयातील एक चिठ्ठी ठरवणार २९ शहरांचा महापौर कोण?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर आता राजकीय वर्तुळात महापौर कोण? याची उत्सुकता पाहायला मिळत आहे. यामुळे सध्या राजकारण तापले आहे. या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणून महापौरपदाच्या आरक्षणाकडे पाहिले जाते. येत्या गुरुवारी, २२ जानेवारी २०२६ रोजी मुंबईतील मंत्रालयात या आरक्षणाची अधिकृत सोडत काढण्यात येणार आहे. यामुळे अनेक राजकीय दिग्गजांचे भवितव्य एका चिठ्ठीवर अवलंबून असणार आहे.

नुकतंच नगर विकास विभागाने यासंदर्भातील एक अधिकृत पत्रक काढले आहे. या पत्रकातून महापौरपदाच्या प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे. ही सोडत मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात सकाळी ११ वाजता राज्याच्या नगर विकास राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडेल. या पारदर्शकतेसाठी ही सोडत चिठ्ठ्या टाकून काढली जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही केले जाण्याची शक्यता आहे. या प्रक्रियेसाठी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव आणि इतर वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**या प्रवर्गांसाठी निश्चित होणार आरक्षण**

अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जाती महिला
अनुसूचित जमाती (ST) आणि अनुसूचित जमाती महिला
इतर मागास प्रवर्ग (OBC) आणि ओबीसी महिला
सर्वसाधारण महिला (General Women)
खुला प्रवर्ग (Open)

**• मोठ्या शहरांमध्ये धाकधूक वाढली, दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला**

या महापौरपदाच्या आरक्षणासाठी मुंबई, पुणे, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये सत्तास्थापनेसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. मात्र, महापौरपदाचे आरक्षण मनासारखे सुटले तरच अनेक इच्छुकांचा मार्ग मोकळा होणार आहे. विशेषतः ज्यांनी मोठी मोर्चेबांधणी केली आहे, त्यांच्यासाठी हा दिवस निवडणूक निकालापेक्षाही मोठा मानला जात आहे. जर एखादी जागा खुला प्रवर्ग म्हणून घोषित झाली, तर तेथे चुरस टोकाला जाईल; मात्र जर पद महिला प्रवर्गासाठी राखीव झाले, तर दिग्गज पुरुष नेत्यांना माघार घ्यावी लागेल.

**• राजकीय गणिते बदलणार?**

निवडणुकीत बहुमत मिळवल्यानंतरही महापौरपदाचे आरक्षण विरोधात गेले, तर अनेकदा राजकीय समीकरणे बदलतात. अशा वेळी अपक्ष किंवा मित्रपक्षांच्या उमेदवारांची मदत घ्यावी लागते. प्रशासकीय पातळीवर या सोडतीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मात्र २९ महापालिकांच्या आयुक्तांना या सोडतीचा अहवाल तातडीने कळवण्यात येणार आहे. येत्या २२ जानेवारीच्या दुपारपर्यंत महाराष्ट्रातील प्रमुख शहरांच्या प्रथम नागरिकाचा चेहरा कोणत्या प्रवर्गातील असेल, हे स्पष्ट होणार आहे.

## चारोटी ते पालघर पायी ‘लाल वादळ’ ; हजारोंचा लाँग मार्च

### शेतकरी-शेतमजूरांच्या प्रश्नांसाठी माकप ची (मार्क्सवादी) जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१९, पालघर :** शेतकरी, शेतमजूर व आदिवासी समाजाच्या विविध ज्वलंत मागण्यांसाठी भारताचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) ठाणे-पालघर जिल्हा कमिटीच्या वतीने आज चारोटी ते पालघर असा भव्य पायी लाँग मार्च सोमवारी काढण्यात आला. डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या ‘लाल वादळा’त हजारो कार्यकर्ते सहभागी झाले असून हा मोर्चा थेट पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवारी धडकणार आहे.




मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील चारोटी येथून दुपारी २ वाजता मोर्चाला सुरुवात झाली. या मोर्चामुळे दुपारनंतर काही काळ मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील पूर्वेकडील गुजरात -मुंबई वाहिनी वरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक तसेच वयोवृद्ध मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते. विविध मागण्यांचा एल्गार असून या लाँग मार्चमधून जल, जंगल व जमीन हक्क, रोजगार हमी योजनेअंतर्गत किमान ६०० रुपये रोज मजुरी व २०० दिवस कामाची हमी, जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरणे, स्वस्त धान्य ३५ किलोपर्यंत देणे, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, पालघर जिल्ह्यातील बहुचर्चित वाढवण व मुरबे बंदर प्रकल्प रद्द करणे, जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा, महावितरणचे स्मार्ट वीज मीटर रद्द करणे आदी प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या.

मोर्चा निघण्यापूर्वी आमदार कॉ. विनोद निकोले, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. अशोक ढवळे व किसान सभेचे नेते कॉ. अजित नवले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील. केंद्र व राज्य सरकार शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य जनतेच्या विरोधात धोरणे राबवत आहेत, असा आरोप यावेळी करण्यात आला. हा मोर्चा शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी असल्याने अनेक शेतकरी बैलगाडी व नांगर घेऊन मोर्चात सहभागी झाले होते. महिलांचा सहभाग लक्षणीय होता. तरुणांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरल्याचे चित्र दिसून आले.

पालघर जिल्ह्यातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा हा विक्रमी पायी मोर्चा ठरला. मोर्चाची रांग तब्बल दोन ते तीन किलोमीटरपर्यंत पसरली होती. पालघर, तलासरी, डहाणू, विक्रमगड, मोखाडा, जव्हार, वाडा तसेच ठाणे जिल्ह्यातील नेते व कार्यकर्ते मिळून अंदाजे १५ ते २० हजारांपर्यंत आंदोलक सहभागी झाल्याची माहिती देण्यात आली.

या मोर्चाचे नेतृत्व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. अशोक ढवळे, मरियम ढवळे, आमदार कॉ. विनोद निकोले, किसान सभेचे नेते कॉ. अजित नवले, कॉ. चंद्रकांत गोरखना, कॉ. किरण गहला तसेच पालघर-ठाणे जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी करत होते.मोर्चादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस अधिकारी व कर्मचारी मिळून ८०० हून अधिक पोलीस तैनात करण्यात आले होते. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिका, अग्निशामक दल व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

आज मासवण, उद्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा संध्याकाळी हा मोर्चा पालघर रोडवरील मासवण परिसरात मुक्कामी थांबणार असून उद्या पुन्हा पायी चालत जाऊन आपल्या विविध मागण्यांसाठी थेट पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडक देणार आहे.

## प्रेयसीला संपवलं, नंतर शोधायचं नाटक!




**दि.१९, छ.संभाजीनगर :** दुसऱ्या व्यक्तीसोबत प्रेम प्रकरण सूरू असल्याचा संशय घेत, प्रेयसीचा गळा आवळून खून करणाऱ्या प्रियकराला जन्मठेप आणि १० हजार रूपये दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायधीश आर. डी. खेडकर यांनी सोमवारी(१९ जानेवारी) ठोठविली. प्रेयसीची हत्या करणाऱ्या प्रियकराचे नाव भोलाकुमार कुंजल मास्टर कुमार (२८, रा. गोरखपुर, उत्तरप्रदेश ह.मु. स्वेराजनगर, मुकुंदवाडी) असे आहे. या प्रकरणात राहुल बरखू राय (वय २०, रा. मुकुंदवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, राहुल रॉय हा कुटूंबासह मुकुंदवाडीतील स्वराजनगरात राहतो. भोलाकुमार हा देखील त्यांच्यासोबत राहत होता. इंदुमती आणि भोलाकुमार यांचे काही वर्षांपासून प्रेम प्रकरण सुरु होते. पण इंदुमतीचे आणखी दुसऱ्यासोबत प्रेम प्रकरण सुरु असल्याचा भोलाकुमारला संशय होता. या प्रकरणावरून इंदुमती आणि भोलाकुमार यांच्यात वाद झाला होता. वादानंतर भोलाकुमारने इंदुमतीचा मोबाईलही जाळला होता. या प्रेम प्रकरणाची कुणकुण लागताच, राहुलचा मोठा भाऊ सुनिल याने भोलाकुमार याला दुसरीकडे रुम बघण्यास सांगितले होते. त्यानुसार भोलाकुमार हा स्वराजनगरात राहण्यासाठी गेला होता. भोलाकुमार याची प्रियसी इंदुमती हिने आपल्याला सोडल्याचा राग त्याच्या मनात होता. भोलाकुमार याने ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास इंदुमतीला मारहाण केली. त्यानंतर तिचा ओढणीची गळा आवळून खून केला. तसेच तिचा मृतदेह गुंडाळून तो मोकळ्या मैदानात आणून टाकला.

## मराठवाड्यातून पुण्याला जाणाऱ्या अनेक रेल्वे हडपसरपर्यंतच धावणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, पुणे :** नांदेड - पुणे एक्सप्रेस सह हरंगुळ (लातूर) - पुणे स्पेशल ही रेल्वे मराठवाड्यातून येणाऱ्या विविध रेल्वे पुणे जंक्शनऐवजी हडपसर स्थानकावर थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय २६ जानेवारीपासून लागू केला जाणार आहे. या निर्णयामुळे मराठवाड्यातील प्रवाशांची चांगलीच गैरसोय होणार आहे. या निर्णयाविरोधात रेल्वे संघटनांनी एकत्र येऊन आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

*** पुण्यात थांबा नसल्याने प्रवाशांना हडपसरमध्ये त्रास**

नांदेड-पुणे एक्स्प्रेस हडपसर येथे पहाटे ४.३० वाजता पोहोचते. यावेळी त्या परिसरात कोणतीही पुणे महानगर



पालिकेची बस सेवा नाही. त्याच बरोबर खासगी वाहने अव्वाच्या सव्वा भाडे आकारतात. पिंपरी-चिंचवड, शिवाजीनगर, स्वारगेट, मनपा, खराडी याठिकाणी जाण्यासाठी थेट कनेक्टिव्हिटी नसल्याने सर्वसामान्य प्रवाशांचे हाल होणार आहे. याचा फटका वृद्ध, महिला, विद्यार्थी आणि दररोज पुण्यात नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या शेकडो मराठवाड्यातील प्रवाशांना बसण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यातून पुण्याला जाणाऱ्या अनेक रेल्वे २६ जानेवारीनंतर हडपसरपर्यंतच धावणार आहे. तत्कालीन रेल्वे मंत्री रावसाहेब दानवे यांच्या काळात नांदेड हडपसर ही रेल्वे चालवण्यात आली होती. ही रेल्वे हडपसरपर्यंत चालवल्यामुळे प्रवाशांची चांगलीच गैरसोय होत होती. यानंतर श्री दानवे यांनी ही रेल्वे पुण्यापर्यंत नेण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना केली. या नंतर ही रेल्वे नांदेड ते पुणे अशी धावत आहेत.

दरम्यान पुणे रेल्वे स्टेशनचे काम सुरू होणार आहे. यामुळे पुणे स्टेशन येथे थांबणाऱ्या रेल्वे अन्य रेल्वे स्टेशनवर थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. यात नांदेड ते पुणे सह अन्य रेल्वेचाही समावेश आहे. नांदेड पुणे सह मराठवाड्यातून पुण्याला जाणाऱ्या रेल्वे पुण्याला थांबण्याची व्यवस्था करण्यात आली नाही, तर आंदोलन करण्याचा इशारा मराठवाड्यातील संघटनांकडून देण्यात आला आहे.

*** रेल्वे पुढे नेण्याची मागणी**

गुजरातसह उत्तर भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांना सोयीचं व्हावं. यासाठी गुजरात आणि उत्तर भारतात जाणाऱ्या रेल्वेला पुण्यात थांबण्याची व्यवस्था आहे. मात्र, मराठवाड्यातून आलेल्या जागा नाही, असे कारण दिले जाते. मराठवाड्यातील रेल्वे प्रवासी संघटनांना गुजरातसह उत्तर भारताकडे जाणाऱ्या रेल्वेला हरंगुळपासून जेजुरीपर्यंत थांबण्याची व्यवस्था करावी अशी मागणी आहे.

अक्षराज



# ‘देवा’ ची इच्छा...




नुकत्याच पार पडलेल्या राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणूकीत अपेक्षेप्रमाणे भाजप नंबर एक राहिला. या निवडणुकीत सर्वांना ऊत्सुकता आहे ती मुंबईचा कारभारी कोण होणार आणि कारभाऱ्यावर लक्ष ठेवण्यासाठी पहारेकरी कोण होणार. भाजप(८९) आणि शिवसेना शिंदे (२९)यांच्या कडे स्पष्ट बहुमत आहे मात्र ते काठावरचे म्हणजेच बहुमतापेक्षा केवळ चार मते जास्त आहेत. इकडे शिवसेना ऊबाठा आणि मनसे मिळुन ७२ तर काँग्रेसचे २४ नगरसेवक आहेत. महापौर पदाची निवडणूक होण्यास वेळ लागणार आहे अगोदर नगरविकास खात्याकडून आरक्षण सोडत निघेल त्यानंतर महापौर पदाची निवडणूक होईल.

पहिल्यांद मुंबईच्या महापौरपदी आपला नगरसेवक बसवायची संधी भाजपला मिळण्याची शक्यता आहे. २०१७ साली झालेल्या निवडणुकीत भाजपने (८४) नगरसेवक निवडून आणले होते मात्र तेव्हा त्यांनी त्यावेळेस शिवसेनेला ८२ नगरसेवक असतांना महापौर पदाची संधी दिली. त्यामुळे यावेळी भाजप संधी सोडण्याची शक्यता नाही आणि पक्षीय बलाबल पहाता ते सहाजिकच आहे. मात्र शिवसेना शिंदे यांची मदत घेतली तरच ते शक्य आहे. त्यातुन शिंदे सेनेकडून संकटात संधी शोधत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षांचे निमित्त पुढे करुन शिवसेनेचा महापौर व्हावा यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी कल्याण, ऊल्हास नगर पालिकांच्या राजकारणाचा देखील संदर्भ आहे. ठाण्यात शिंदे सेनेला एकहाती सत्ता मिळाली आहे मात्र तेथे भाजप प्रसंगी विरोधी पक्षात बसु अशी भाषा करत आहे. शिवसेनेने आपल्या सर्व नगरसेवकांना एका हॉटेल मधे ठेवले आहे ते कश्यासाठी याचा ऊलगडा होत आहे. दुसरीकडे ऊद्धव ठाकरे हे देखील महापौर पदाबाबत हालचाली करत आहे आणि त्यांची नजर शिंदे सेनेच्या नगरसेवकांवर आहे. राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा मित्र वा शत्रु नसतो हे लक्षात घेऊन राजकारण, सत्ताकारण चालते. निवडणूक संपताच देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूका संपल्या आता आमचे कुणाशी शत्रुत्व नाही असे म्हटले आहे, तर ऊद्धव ठाकरे यांनी’ देवा’ची इच्छा असेल तर आपला महापौर होईल असे नगरसेवकांशी बोलतांना सांगितले. दोघांमध्ये चर्चा देखील झाल्याची चर्चा होत आहे.

गेल्या काही वर्षांपासून राज्याचे राजकारण आणि सत्ताकारण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भोवतीच फिरत आहे. भाजपच्या या यशाचे खरे शिल्पकार दिल्लि चे वंडरबॉय ’देवेंद्र फडणवीस’ हे च युगंधर आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. २०१४ च्या सत्तांतरानंतर देशात आणि राज्यात सब कुछ बीजेपी असे चित्र निर्माण झाले आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ’देशात नरेंद्र - राज्यात’ देवेंद्र’ याची मोठी चर्चा झाली आणि देवेंद्र फडणवीस यांच्या कडे राज्याचे मुख्यमंत्रीपद आले. त्यांनी संधीचे सोने करत शतप्रतिशत भाजपला प्रत्येक निवडणुकीत यश मिळवुन दिले,याला अपवाद होता तो २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपला केवळ नऊ जागा मिळाल्या याचे शल्य त्यांनी बोलुन दाखवले मात्र नाऊमेद न होता त्यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपला ऐतिहासिक बहुमत मिळवुन दिले. वयाच्या अवघ्या बावीसाव्या वर्षी ते नागपुर महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले, कालांतराने महापौर झाले. १९९९ साली पहिल्यांदा विधानसभेत पोहचले, त्यानंतर त्यांच्या यशाची चढती कमान एक एक यश मिळवत सुरूच आहे. २०१९ साली मुख्यमंत्री पदाची संधी हुकली म्हणून ना ऊमेद न होता त्यांनी राजकीय कौशल्य दाखवत २०२२ साली चमत्कार करत’ मविआ’ सरकारचा’ करेक्ट’ कार्यक्रम केला.

२०२२ साली शिवसेना आणि २०२३ साली राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांचा देखील करेक्ट कार्यक्रम त्यांनी केला. राष्ट्रवादी च्या घडय़ाळाचे तर टाईतमिंगच चुकवून टाकले. दिल्लित जसे अमित शहा यांना राजकारणातले चाणक्य म्हणून ओळखले जाते तसेच राज्यात’ देवा’ भाऊंना जुनियर चाणक्य म्हणून ओळखले जाते. भविष्यात देखील त्यांना अनेक संधी मिळण्याची शक्यता आहे वय ही त्यांची जमेची बाजू आहे. दिल्लीमधे देखील त्यांच्या शब्दाला वजन आहे आणि अनेकदा भविष्यातील पंतप्रधान म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. पक्षाचा एकनिष्ठ, सच्चा कार्यकर्ता कसा असावा हे फडणवीस यांनी दाखवुन दिले आहे.प्रसंगी मुख्यमंत्री पद भुषवले असतांनाही ऊपमुख्यमंत्री पद स्विकारलेली.आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत देखील भाजपला घवघवीत यश मिळेल याबाबत दुमत नाही.तेव्हा मुंबई काय किंवा इतर महानगरपालिकांच्या सत्ताकारणात ’देवा’ ची इच्छा काय असेल यावर बरेच काही अवलंबून आहे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# फलंदाजांची हाराकिरी आणि स्वैर गोलंदाजी

भारतीय क्रिकेट संघ जगातील एक बलाढ्य क्रिकेट संघ म्हणून ओळखला जातो. त्यामुळे भारतीय संघाला हरवणे ही तशी सोपी गोष्ट नसते त्यात जर मालिका भारतात असेल तर भारतीय संघाला हरवणे ही जवळपास अशक्यप्राय गोष्ट पण हा झाला भुतकाळ. आता भारतीय संघाला भारतात येऊन कोणीही सहज हरवू शकतो हे न्यूझीलंड संघाने सिद्ध केले. न्यूझीलंड संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर असून भारतीय संघासोबत तो तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळला. या मालिकेतील पहिला सामना भारतीय संघाने सहज जिंकत मालिका आपणच घशात घालणार अशा आविर्भावात उरलेले दोन सामने खेळला आणि तिथेच घात झाला. पहिल्या सामन्यात पराभूत झालेल्या न्यूझीलंड संघाने उरलेल्या दोन सामन्यात भारतीय संघाला सहज हरवले आणि मालिका २ - १ ने जिंकत इतिहास घडवला. न्यूझीलंड संघासाठी हा मालिका विजय ऐतिहासिकच आहे कारण न्यूझीलंडने पहिल्यांदाच भारताला भारतात हरवून मालिका जिंकण्याचा पराक्रम केला. त्यांच्या डॅरिल मिचेल या फलंदाजाने सलग दोन सामन्यात शतक झळकावले तसेच पहिल्या सामन्यात ८५ धावांची खेळी करून भारतीय गोलंदाजांची पिसे काढली. त्यांच्या इतर फलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिली. त्यांच्या गोलंदाजांनी आपल्या फलंदाजांना मोक्याच्या वेळी बाद करून न्यूझीलंड संघाला मालिका विजय मिळवून दिला. न्यूझीलंडच्या या मालिका विजयाने क्रिकेट प्रेमींना धक्का बसला असला तरी क्रिकेट जाणकारांसाठी मात्र भारताचा हा पराभव अपेक्षितच होता कारण गेल्या काही वर्षात कसोटी असो की एकदिवसीय मालिका भारतीय संघ परदेशी संघापुढे लोटांगण घालत आहे. याआधी दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या संघाने भारताला भारतात येऊन कसोटी किंवा एकदिवसीय मालिकेत नमवले आहे. परदेशी संघ भारतात येऊन भारतीय संघाला धूळ चारत असतानाही भारतीय संघाच्या कामगिरीत कोणतीही सुधारणा होत नाही हे विशेष. भारतीय संघाचा सातत्याने पराभव होत असतानाही निवड समिती असो की बीसीसीआय, खेळाडू असो की संघ व्यवस्थापन याचे विश्लेषण किंवा पराभवाचे आत्मचिंतन करत नाही. न्यूझीलंडने भारतावर मिळवलेला विजय फलंदाजांची हाराकिरी आणि स्वैर गोलंदाजीमुळे झाला आहे हे कोणीही सांगेल. न्यूझीलंड संघाने तीनही सामन्यात जवळपास ३०० च्या वर धावा काढल्या याचाच अर्थ भारतीय गोलंदाजांची त्यांनी यथेच्छ धुलाई केली. भारतीय संघात हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णा या गोलंदाजांना का खेळवण्यात येत आहे असा प्रश्न पडतो कारण या दोन्ही गोलंदाजांची प्रत्येक सामन्यात यथेच्छ पिटाई होते. संपूर्ण मालिकेत या दोन्ही गोलंदाजांनी खूप धावा दिल्या जवळपास एका षटकात ७ च्या सरासरीने त्यांनी धावा दिल्या हे फक्त न्युझीलंड विरुद्धच्या मालिकेतच घडले असे नाही तर याआधीही त्यांना असाच मार पडला आहे तरीही त्यांना खेळवण्याचा अट्टाहास केला जातो. प्रशिक्षक गौतम गंभीर यांचे ते लाडके असल्याने त्यांना संधी दिली जाते का ? हा प्रश्न पडतो. एकीकडे खूप मार खाऊनही त्यांना संघात स्थान दिले जातेय तर मोहम्मद शमी सारखा दर्जेदार गोलंदाज सातत्याने चांगली गोलंदाजी करूनही त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. मोहम्मद शमीला का डावलले जाते याचे उत्तर निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाने द्यायला हवे. रवींद्र जडेजा हा भारताचा अष्टपैलू खेळाडू पण एकदिवसीय सामन्यात त्याने अपवादात्मक परिस्थितच अष्टपैलू खेळ केला आहे. एकदिवसीय सामन्यात भारतात अर्धशतक झळकावून त्याला जमाना झाला. गोलंदाजीतही त्याची धार कमी झाली आहे. कुलदीप यादवच्या फॉर्म ही हरवला आहे. या मालिकेत जसप्रीत बुमरा आणि हार्दिक पांड्याची उणीव भारताला जाणवली. या मालिकेत कोहलीने अपेक्षित धावा काढल्या मात्र त्याला इतर फलंदाजाकडून साथ मिळाली नाही. रोहित शर्माने सुरुवात धडाकेबाज केली पण मोठी खेळी करण्यात त्याला अपयश आले. शुभमन गिलने दोन अर्धशतके झळकावली पण त्याला अर्धशतकाचे रूपांतर शतकात करता आले नाही. के एल राहुलने पहिल्या सामन्यात शतक झळकावले पण पुढच्या दोन सामन्यात त्याला खास काही करता आले नाही एकूणच विराट कोहली वगळता एकही खेळाडू आपल्या लौकिकास साजेसा खेळ करु शकले नाही त्यामुळेच भारताला हा पराभव स्वीकारावा लागला आहे. भारतीय संघाला सातत्याने मिळत असलेल्या अपयशाचे आत्मचिंतन भारतीय संघाने, निवड समितीने आणि संघ व्यवस्थापनाने करायला हवे. जर पराभवाचे आत्मचिंतन केले नाही तर भविष्यातही या पराभवाची पुनरावृत्ती होऊ शकते याचे भान भारतीय संघाने ठेवावे.

**- श्याम ठाणेदार**

# बदलत्या खेडेगावांची कहाणी...



गाव बदलत आहेत! नव्हे गावं आता पार बदलूनच गेली आहेत!२५-३० वर्षांपूर्वीची गावं अगदी वेगळीच होती. आता गावात एखादा पंचवीस तीस वर्षांपूर्वी आलेला व्यक्ती अचानक आला तर त्याला एखाद्या नवीन ठिकाणी आल्याचा भास झाल्याशिवाय राहणार नाही. पूर्वी गावात शिरण्यापूर्वीच हागणदारीचा वास येत असे. थोडक्यात येणारा हा वासच गाव जवळ आल्याची दवंडी देत असे. गावात सर्वत्र अस्वच्छता होती. त्यामुळे विशेषतः पावसाळ्यात रोगराईचे साम्राज्य पसरत असे. आषाढात उलटी-जुलाबाची साथ हमखास येत असे. डोळे येणे, खरूज होणे अशा साथीच्या आजारांनी गरीब आणि मागासलेल्या समाजातील लोक फार त्रस्त असत.

गावात दळणवळणाची मोठी अडचण होती. मुक्काम एसटी सकाळी लोकांना तालुक्याला किंवा जवळच्या मोठ्या गावाला घेऊन जायची; सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अश्या फक्त तीनच एसटीच्या फेऱ्या होत असत. पुढे वडाप-जीप वाढू लागल्या. कमांडर कंपनीच्या जीपा त्या काळात सर्वाधिक दिसत. लोक मुंग्यांसारखे भरून या कमांडर गाड्या खड्डे चुकवत रस्त्यावरून धावत असत. ड्रायव्हर तिरके बसून ही जिपडी वाऱ्याच्या वेगाने चालवत. घराघरांवर दूरदर्शनसाठी उंच अँटिने उभे केलेले दिसत. घरात ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही होते; श्रीमंत आणि सावकार लोकांनी घरात रंगीत टीव्ही नवलाई म्हणून घेतले होते . गावाची सकाळ मंदिरांच्या शिखरावर लावलेल्या करण्यांमधून ऐकू येणाऱ्या भोपाळीने व्हायची, तर रात्र कीर्तन-भजन ऐकत संपायची. जत्रा-यात्रा लोकांच्या थोड्याशा मौजमजेसाठी असत. कुस्त्यांच्या फडावर मर्दानगी सिद्ध होत असे; तर तमाशाच्या फडात कित्येक मर्द मोहित होत असत.झेडपी शाळांमधून मुलं प्राथमिक शिक्षण घेत; पंचक्रोशीत एखादं हायस्कूल असायचं आणि तिथे मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत असे. अनेक विद्यार्थी या मराठी शाळांतून शिकून मोठ्या पदांवर पोहोचले आणि निवृत्तही झाले. गावात स्पष्ट वर्णव्यवस्था आणि बलुतेदारी होती. जाती-पातीच्या विषारी वेलीत समाज जोखडला होता. पण तरीही शेतीवर आधारित अर्थव्यवस्था सर्वांना जगवत होती.

आता गावं पूर्णपणे बदलली आहेत. शहरातील सुखसुविधा खेड्यांपर्यंत पोहोचल्या आहेत. टीव्हीवर असंख्य चॅनेल उपलब्ध आहेत. आर्थिक सुबत्तेमुळे गावातही शहरातील घराप्रमाणे सुंदर बंगले उभे राहिले आहेत. या बंगल्यांसमोर लाखो रुपयांच्या कार दिसतात.

गावं -शहरं चांगल्या रस्त्यांनी जोडल्याने खेड्यातले अनेक लोक रोज शहरात कामाला जाऊन संध्याकाळी गावात परत येतात. पंचक्रोशीत इंग्लिश-मिडियम शाळा वाढल्या आहेत. स्कूलबसभरुन मुलं शेजार पाजारच्या गावातून गोळा केली जातात. आता गावातही इंग्रजीतून शिक्षण घेण्याचं वार सोसाट्याने वाहत आहे.

पूर्वी गावामध्ये ठिगळं लावलेल्या पँटी घालून पोर ठिगळं लपवत लपवत शाळेला जायची. आता पोरांकडे फॅशनेबल कपडे आहेत. गावातील सायकलीच्या जागा आता दुचाकींनी घेतल्या आहेत. आता गावातील पुढारपण करणारे लोक दररोज शहराकडे जातात आणि संध्याकाळी गावात येतात. घरोघरी कारभारी झाले आहेत. शहरात भट्टीचे कपडे घालून स्वतःला मिरवून आणणं गावातील या तथाकथित पुढाऱ्यांसाठी भूषणावह झालं आहे. पुढारपण करण्याची हौस गावात वाढत आहे. एकमेका विरुद्ध काड्या करणे , चाड्या चुगल्या करणं, अपप्रचार करणं यातून गावातल्या राजकारणाला ऊत आला आहे. प्रत्येक तरुणाच्या हातात आता मोबाईल आला आहे. रील आणि व्हिडिओ यानं तरुणांची डोकी फिरवली जात आहेत. रात्र रात्रभर मोफत डाटा झोपू देत नाही . मोबाईलवर काय बघावं आणि काय नको याचं तारतम्य राहिलं नाही. माहिती ज्ञान मिळवण्यापेक्षा इचकट विचकट व्हिडिओ बघून पोरं पोरी बिघडली आहेत. स्वस्तात प्रसिद्धी मिळवण्यासाठी अनेक जण रिलच्या नादी लागले आहेत. खेड्यातील अर्थव्यवस्था आता पार बदलून गेली आहे. नोकरीसाठी अनेकांनी गाव सोडलं आहे. कोणतंही शिक्षण आणि कौशल्य नसणाऱ्यांना शहरात झोपडपट्ट्यात राहवं लागत आहे. तर ज्यांनी उच्च कौशल्यपूर्ण शिक्षण घेतलं आहे त्यांना शहरात मानसन्मानानं जगता येऊ लागलं आहे.

गाव बदलली, काळ बदलला, आणि माणसांच्या जगण्याची पद्धतही बदलली. परंतु या बदलाच्या प्रवाहात संस्कृती, माणुसकी, नातेसंबंध आणि मूल्यांची जपणूक केली गेली पाहिजे.

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## चढाओढ

सत्ताकेंद्रे पदांसाठी
चालूहोय चढाओढ
बदलाव कैक वेळा
सारखी खोडाखोड

वादावाद शिगे पोचे
अंतर्गत रे मारझोड
भांडतात मित्र पक्ष
टिकेची उडवी झोड

अधिक हवा ताटात
सत्तेचा मलिदा गोड
भुकेला कोण नाही
सत्तेविना झाले रोड

अवघड भलता गड
करताना पाणी तोड
स्ट्राईकरेट असे बडे
मुद्दे मांडले बिनतोड

कुणाचेहोई महापौर
रे सुटतासुटेना कोडं
अनुभव कटू आधी
मोडली न जाईखोड

हॉटेलात पार्ट्या झडे
घेऊआले तक्केलोड
श्रेष्ठीनिर्णय मानायचे
कशाला घ्यावा लोड

खेळ रंगात वरिष्ठांचा
बंदुकाझाल्यात लोड
निखळून पडू लागले
दृढ फेव्हिकॉल जोड

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खापरखेड्यात तेली समाज महिलांचा हळदी-कुंकू सोहळा उत्साहात




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** भानेगाव, नविन बिना, खापरखेडा, प्रकाशनगर संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज मंडळ यांच्या वतीने मकर संक्रांतीनिमित्त आयोजित 'सस्नेह मिलन व हळदी-कुंकू' कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. शनिवार १७ जानेवारी २०२६ रोजी प्रकाशनगर येथील 'सदभावना मनोरंजन गृह क्रमांक २ मध्ये हा सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा.श्वेता विवेक रोकडे यांच्या हस्ते संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मकर संक्रांतीचा आनंद द्विगुणित केला. सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य आकर्षण ठरले. चिमुकल्या मुलांनी आपल्या बहारदार नृत्याने उपस्थितांची मने जिंकली तर महिलांनी गायन, नृत्य आणि पारंपारिक 'उखाणे' सादर करत आपल्या सुप्त गुणांना वाव दिला.

परंपरेनुसार महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून, वाण देऊन आणि 'तीळगुळ घ्या, गोड-गोड बोला' म्हणत शुभेच्छांची देवाणघेवाण केली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी पायल बावने, सोनु पाहुणे, योगिता शेंडे, रूचिता काचोरे, तृप्ती खनके, निशा किरपाने, सोनाली कापसे, मोनाली सुरकर, सोनु मस्के यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आयोजकांनी समाधान व्यक्त केले आणि उपस्थितांचे आभार मानले समाजातील महिलांना एकत्र आणून संस्कृती जोपासण्याचा आणि विचारांची देवाणघेवाण करण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.




भरती विद्यापीठ इंग्लिश मीडियम स्कूल, सीबीडी बेलापूर येथे डॉ.पतंगराव कदम यांच्या जन्मदिनाच्यानिमित्त रोड सेफ्टी सप्ताह अनुषंगाने रोड सेफ्टी व वाहतुकीचे नियम या विषयावर शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांना सीबीडी वाहतूक शाखेचे सपोनी लोखंडे यांनी प्रबोधन केले.



## दक्षिणमध्ये शिंदेसेनेची स्वबळावर लढण्याची तयारी



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१९, सोलापूर :** स्वबळावर सोलापूर  दक्षिण सोलापुरात आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका पक्षाने लढाव्यात अशा सूचना शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी पक्षाच्या नेत्यांना दिल्या. नेत्यांनी मात्र सबुरीचे धोरण स्वीकारले असून, युतीसाठी मित्रपक्षांना साद घातली आहे.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसंदर्भात चर्चा करण्यासाठी दक्षिण सोलापूर मतदारसंघातील हत्तूर, मंद्रूप आणि भंडारकवठे या तीन जि.प. गटातील कार्यकर्त्यांची बैठक जुळे सोलापूर परिसरातील माजी आमदार रतिकांत पाटील यांच्या निवासस्थानी बोलावण्यात आली होती. या बैठकीला जिल्हाप्रमुख अमर पाटील, योगिराज पाटील, धर्मराज बगले यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीत शिंदेसेनेने उत्तम कामगिरी बजावली असून, आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याच्या सूचना अनेकांनी या बैठकीत केल्या. मात्र, राज्यात सत्तेत असलेल्या मित्रपक्षांची युती करण्याचा पर्याय जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी पुढे ठेवल्याचे समजते.

"महायुतीच्या मित्र पक्षांशी आमचा संपर्क सुरू आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील हत्तूर, मंद्रूप आणि भंडारकवठे या तीन गटांत स्वतंत्र लढण्याची तयारी असली तरी सन्मानजनक तोडगा निघाल्यास युती करण्याची तयारी आहे.

**- अमर पाटील, जिल्हा प्रमुख, शिंदेसेना**

# सौरऊर्जा प्रकल्प बसविताना होतेय फसवणूक !

● ग्राहकांनी सौरसंचाची खरेदी नेहमी अधिकृत पुरवठादाराकडूनच करावी. जास्त अनुदानाचे आणि कमी किंमतीत प्रकल्प बसवण्याचे आमिष दाखवणाऱ्या व्यक्तींपासून नागरिकांनी सावध राहावे व आर्थिक फसवणूक टाळावी. कोणत्याही आमिषाला बळी न पडता उच्चवदर्जाचे सोलर पॅनल बसवण्यास पसंती दर्शवावी.

● ३० वर्ष अविरत प्रकल्प चालू राहण्यासाठी उच्च दर्जाचे सौर ऊर्जा पॅनल वापरून हा प्रकल्प उभारण्यासाठी योग्य वेंडर निवडणे आवश्यक आहे. कमी किंमतीत आणि जास्त अनुदान देणाऱ्या भामट्यांपासून फसवणूक होऊ नये याची ग्राहकांनी काळजी घ्यावी

**- जयभीम कांबळे, सोलर पॉवर व्हिजन**

## बाजारभावापेक्षा कमी किंमतीचे ग्राहकांना आश्वासन

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१९, पाटण :** केंद्र सरकारच्या पुढाकाराने आज घरोघरी सौर ऊर्जा प्रकल्प उभारले जात आहे. केंद्राने या प्रकल्प उभारणीसाठी अनुदान जाहीर केल्यानंतर देशांत सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्यास गती मिळाली आहे.

१ किलो वॅट ते ३ किलो वॅट ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी घरगुती ग्राहकांना ३०,००० ते ७८,००० पर्यंत अनुदान देण्याचे काम केंद्र सरकार करते. मात्र, या अनुदानापेक्षा जास्त अनुदान मिळवून देऊ अशी भाम टेगिरी करून तसेच मार्केट भावापेक्षा सर्वात कमी किंमतीत सौर प्रकल्प उभारून देण्याची खोटी आश्वासने देणाऱ्या भामट्यांकडून फसवणूक होत असल्याचे चित्र दिसत आहे.



सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर हा प्रकल्प तब्बल ३० वर्ष चालतो. हे प्रकल्प अव्वल दर्जाचे सोलर पॅनल सहित इतर मटेरियल वापरले जाते. तसेच या प्रकल्प बसवून झाल्यावर घरगुती अनुदान आधारित ग्रीड कनेक्टिव्हिटी प्रकल्पाची महावितरण कडून त्याच्या दर्जाची चाचणी होते आणि तद्नंतर प्रकल्प सुरू करण्यास परवानगी देण्यात येते.

मात्र, यात आता काही भामटे सोलर प्रकल्प व्यवसायात शिरले असून ते मनमानी कारभार करून कमी किंमतीचे आश्वासन देऊन निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून ग्राहकांना चुना लावत आहे.

यात अनेक वेळा महावितरण कडून त्याच्या दर्जाबाबत काना डोळा केला जात आहे. ग्रामीण भागात अनुदान जास्त मिळवून देतो, एवढे पैसे भरा, कर्ज सुविधा देतो, सबसिडी आल्यावर पैसे द्या असे एक ना अनेक गोष्टींची भुरळ घालून ग्राहकांची फसवणूक होत आहे काही ठिकाणी पैसे घेऊन प्रकल्प बसवणार प्रतिनिधी गायब झाल्याचे उघडकीस आले आहे.

# मुलमधील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात १८० विद्यार्थी प्रवेश क्षमतेला मंजुरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांतून आगामी शैक्षणिक वर्षापासून मुल येथे सुरू होत असलेल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाला १८० विद्यार्थी क्षमतेसाठी राज्य शासनाने मंजुरी प्रदान केली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हे शक्य होऊ शकले आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने हे ऐतिहासिक पाऊल ठरले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून मुल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू होत आहे. शासन निर्णयानुसार शासकीय तंत्रनिकेतन, मुल, जिल्हा चंद्रपूर हे सुरुवातीच्या टप्प्यात नगरपरिषदेच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात सुरू होईल. याठिकाणी इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकॉम्युनिकेशन इंजिनिअरींग आणि कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅण्ड इंजिनिअरींग या तीन विद्याशाखांमध्ये एकूण १८० प्रवेश क्षमतेसह विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. सदर संस्थेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेसाठी अर्ज करण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करण्याचे निर्देशही राज्य सरकारने दिले आहेत.

या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्हा व विशेषतः मुल तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. दीर्घकालीन दृष्टीने हे शासकीय तंत्रनिकेतन मुल येथील गट क्रमांक ८०२, ८०३ व ८०४ मधील सुमारे १.६० हेक्टर म्हणजेच अंदाजे चार एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात येणार आहे. या जमिनीवर होणाऱ्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नकाशांना मान्यता घेऊन आवश्यक बांधकामाची कार्यवाही वेगाने सुरू करण्यात येणार आहे. तोपर्यंत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून नगरपरिषद मुल अंतर्गत असलेल्या उपलब्ध इमारतींमध्ये तात्पुरत्या स्वरूपात अध्यापन सुरू होणार आहे.




**आ.मुनगंटीवारांच्या पाठपुराव्याला मोठे यश**

मुल येथे शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्याच्या प्रस्तावाला यापूर्वीच सुमारे १७३.९१८ कोटी रुपयांच्या खर्चासह राज्य मंत्रिमंडळाची मान्यता मिळालेली आहे. या अंतर्गत टप्प्याटप्प्याने ३९ शिक्षकीय व ४२ शिक्षकेतर पदे मंजूर करण्यात आली असून आवर्ती व अनावर्ती खर्चालाही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान मुल येथील जनतेला दिलेला शब्द आ. मुनगंटीवार यांनी या निर्णयातून पूर्ण केला असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**● मनुष्यबळ निर्माणाची प्रक्रिया सुलभ**

चंद्रपूर जिल्ह्यात औद्योगिक विस्ताराला वेग मिळत असून सुरजागड इस्पात प्रा. लि.सह विविध उद्योग प्रकल्प उभारणीच्या मार्गावर आहेत. खनिकर्म, वीज निर्मिती, लोहनिर्मिती, ऑटोमेशन आणि बांधकाम क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेता स्थानिक युवकांसाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने हे शासकीय तंत्रनिकेतन अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. यासाठी आ. मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. स्थानिक विद्यार्थ्यांना जिल्ह्याबाहेर न जाता गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण मिळण्याचा मार्ग या निर्णयामुळे खुला झाला आहे.

**● शैक्षणिक क्षेत्रातील विकास**

आ.सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यात शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सैनिकी शाळा, मेडिकल कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेज, महिला सक्षमीकरण केंद्र, कृषी व अभियांत्रिकी शिक्षण संस्था, गोंडवाना विद्यापीठाचे उपकेंद्र यांसारख्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. मुल येथे शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्यास मिळालेली मान्यता ही त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित मानली जात आहे.

# मिरा-भाईंदर विकासाला नवी गती ! मेट्रोला मंजुरी, मोफत वाय-फाय आणि रस्ते प्रकल्प - परिवहन मंत्री

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१९, मीरा-भाईंदर :** मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात लवकरच मोफत वाय-फाय सुविधा सुरू केली जाईल, अशी घोषणा प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत केली. निवडणुकी दरम्यान पक्षाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी राज्य सरकारने आवश्यक निधी मंजूर केला आहे, असे त्यांनी सांगितले. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मीरा-भाईंदर शहराचा विकास जलद गतीने सुरू आहे.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, शहरातील मुख्य सार्वजनिक ठिकाणी मोफत वाय-फाय सुविधा देण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला जात आहे आणि या योजनेसाठी राज्य सरकारने १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. ही योजना बीओटी (बांधकाम-चालवा-हस्तांतरण) मॉडेलवर राबविली जाईल. शहराच्या वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणारा मेट्रो-९ चा पहिला टप्पा फेब्रुवारीमध्ये नागरिकांच्या सेवेसाठी सुरू होणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. मेट्रो सुरू झाल्याने मीरा-भाईंदरमधील नागरिकांची दीर्घकाळ ची प्रतीक्षा आता संपली आहे.

याशिवाय, मीरा-भाईंदर शहर खड्डेमुक्त करण्यासाठी रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यासाठी १२०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला आहे. पुढील दीड ते २ वर्षांत संपूर्ण



शहर खड्डेमुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.महिला सक्षमीकरणासाठी शहरात 'उमेद' मॉल उभारण्यात येईल, जेणेकरून महिला बचत गटांना त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळेल. यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

यासोबतच, महिलांसाठी वसतिगृह बांधण्यासाठी राज्य सरकारने ५० कोटी रुपयांचा आणखी एक निधी मंजूर केला आहे. शिवसेना शिन्दे चे तीन उमेदवार निवडून आले. आमची संख्या फारच कमी तरी मी मिरा भाईंदर च्या विकासासाठी शासना कडुन मदत मिळवण्यासाठी प्रयत्न करीत राहील. मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, मीरा-भाईंदरचे लोकप्रतिनिधी म्हणून शहराला आधुनिक सुविधांनी सुसज्ज करणे हे माझे  कर्तव्य आहे आणि विकासकाम कोणत्याही कारणास्तव थांबू दिले जाणार नाही. त्यांनी दिलेली सर्व आश्वासने वेळेवर पूर्ण होतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# विसापूर येथे उद्यापासून संत तुकाराम महाराज जयंती महोत्सव

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९ चंद्रपूर :** विसापूर येथील सकल कुणबी समाजाच्या वतीने जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त दिनांक २१ व २२ जानेवारी २०२६ ला विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम धनोजे कुणबी समाज सभागृह वार्ड क्रमांक ४ व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पार पडणार असून संत तुकाराम महाराज यांची पालखी मिरवणूक धनोजे कुणबी सभागृह येथून बुधवार, दि. २१ रोजी सकाळी ८ वाजता निघणार आहे. यावेळी भजन मंडळाचा सहभाग राहणार आहे. यासाठी समाज बांधवांनी जय्यत तयारी केली आहे.

बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील सकल कुणबी समाज बांधव बुधवारी सकाळी ८ वाजता जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेची पुजा करून पालखी मिरवणूक काढली जाणार आहे. यामध्ये गावातील जय दुर्गा महिला भजन मंडळ, गुरुदेव सेवा भजन मंडळ, राधिका महिला भजन मंडळ, राधाकृष्ण महिला भजन मंडळ, पदावली भजन मंडळ व जय हनुमान महिला भजन मंडळाचा सहभाग राहणार आहे. दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज, सार्वजनिक मंचावर सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत पावडे यांच्या अध्यक्षतेखाली संत तुकाराम महाराज यांच्या जीवनावर आधारित प्रबोधन व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ घेतला जाणार आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुरज गोहणे, अशोक थेरे, विलास भोयर, माजी जि.प.सदस्य रामभाऊ टोंगे, योगेश्वर टोंगे, प्रभाकर टोंगे, गोसाई डाहुले, सुमन गौरकार, ललिता खैरकर, विना नांदे, शारदा डाहुले, आशा काळे, निता मिलमीले, विद्या देवाळकर, अंकीता टोंगे यांची उपस्थिती राहणार आहे. दुसऱ्या दिवशी गुरूवारी सकाळी ११ वाजता महिलांसाठी धनोजे कुणबी समाज सभागृहात हळदीकुंकू कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता शैलेश कावळे महाराज यांचे किर्तन होत आहे. त्याच प्रमाणे मार्गदर्शन कार्यक्रम दरम्यान राजश्री वाकुडकर, तहसीलदार रेणुका कोकाटे, बॉटनिकल गार्डनचे वन परिक्षेत्र अधिकारी प्रकाश झाडे, सुवर्णा उमाटे, पोलीस निरीक्षक विपीन इंगळे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी उदयोन्मुख गायिका गायत्री थिपे यांचे गीतगायन होणार आहे. सदर कार्यक्रमाला समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले.

# भूमिपुत्र एल्गार संघटनेची तलासरी तालुका कार्यकारिणी जाहीर

## नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा अन्यायाविरोधात संघर्षाचा निर्धार

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१८, तलासरी (पालघर) :** भूमिपुत्र, आदिवासी, शेतकरी, मजूर आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या भूमिपुत्र एल्गार संघटना महाराष्ट्रने संघटन विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत तलासरी तालुका कार्यकारिणीची अधिकृत घोषणा केली आहे. या नव्या कार्यकारिणीमुळे तलासरी तालुक्यात संघटनेच्या कार्याला बळ मिळणार असून तळागाळातील जनतेच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाणार आहे.

संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रमोद पवार यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यामध्ये अनिल करबट यांची तालुका अध्यक्ष, सुनिता वळवी यांची तालुका सचिव, भारती गांगड यांची तालुका उपाध्यक्ष तर जयंती वळवी यांची तालुका नारी शक्ती प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे.



याप्रसंगी संघटनेचे कार्याध्यक्ष सुनील लोणे, सरचिटणीस नवनाथ भोये, आदिम शक्ती प्रमुख स्वप्नील वाघ, वेद राऊत यांच्यासह तालुक्यातील अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्य अध्यक्ष प्रमोद पवार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भूमिपुत्र एल्गार संघटना भूमिपुत्र, आदिवासी, शेतकरी, मजूर व वंचित घटकांवरील अन्यायाविरोधात सातत्याने लढा देत आहे. तलासरी तालुक्यातील नवनियुक्त पदाधिकारी संघटनेची ध्येयधोरणे प्रभावीपणे राबवून जनतेच्या प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेतील, असा आम्हाला विश्वास आहे.

**नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा निर्धार**

तालुका अध्यक्ष अनिल करबट म्हणाले, भूमिपुत्र एल्गार संघटनेने माझ्यावर सोपवलेली जबाबदारी हा माझ्यासाठी सन्मान आहे. प्रमोद पवार यांच्या नेतृत्वाखाली तलासरी तालुक्यातील आदिवासी, भूमिपुत्र व मजूर वर्गाच्या प्रश्नांसाठी संघटना अधिक मजबूत करून अन्यायाविरोधात ठामपणे लढा देऊ.

तालुका सचिव सुनिता वळवी यांनी सांगितले, महिलांचे प्रश्न, आदिवासी समाजाचे हक्क, शिक्षण, रोजगार व सामाजिक न्यायासाठी संघटनात्मक पातळीवर सक्रिय काम करून संघटनेची विचारधारा तळागाळात पोहोचण्याचा प्रयत्न करेन.

तालुका उपाध्यक्ष भारती गांगड म्हणाल्या, शोषित व वंचित घटकांचे प्रश्न प्रशासनासमोर ठामपणे मांडून न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून संघर्ष उभारला जाईल.

नारी शक्ती प्रमुख जयंती वळवी यांनी स्पष्ट केले की, महिलांवरील अन्याय, शोषण, घरगुती हिंसाचार तसेच रोजगार व स्वावलंबनाच्या प्रश्नांवर महिलांना संघटित करून न्यायासाठी लढण्याचा माझा निर्धार आहे.

संघटनेला नवी ऊर्जा या नव्या नियुक्त्यांमुळे तलासरी तालुक्यात भूमिपुत्र एल्गार संघटनेला नवी ऊर्जा मिळाली असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी काळात तालुक्यातील विविध सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय प्रश्नांवर संघटना अधिक आक्रमक भूमिका घेणार असल्याचे संकेत यावेळी देण्यात आले.

# थोडक्यात

## खापरखेडा येथे ब्रह्मा बाबांचा ५७ वा स्मृतिदिन 'विश्व शांती दिवस' म्हणून साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१८, नागपूर :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रात संस्थेचे संस्थापक साकार प्रजापिता ब्रह्मा बाबा यांचा ५७ वा पुण्यतिथी दिवस मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. हा दिवस 'विश्व शांती दिवस' म्हणून पाळला जातो त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. केंद्राच्या मुख्य संचालिका संगीता दीदी यांनी यावेळी ब्रह्मा बाबांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, संस्थेचे संस्थापक दादा लेखराज (ब्रह्मा बाबा) यांनी १९३७ मध्ये या संस्थेची स्थापना केली, त्यांनी दिलेली पवित्रता, सरलता, सहनशीलता, त्याग आणि तपस्येची शिकवण आजही लाखो लोकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानामुळे अनेकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडून आले आहे. याप्रसंगी खापरखेडा परिसरातील नागरिकांनी केंद्रात उपस्थित राहून बाबांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. मानवी जीवनात स्वतःला पवित्र बनवून आध्यात्मिक मूल्ये जोपासण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. 'स्वतःच्या परिवर्तनातून विश्व परिवर्तन' हा संदेश उपस्थितांना देण्यात आला. या कार्यक्रमाला प्रामुख्याने डॉ.ओमकार केळवदे, अमर जैन, कपिल वानखेडे, विष्णू बाबल, भाऊराव चिकनकर, हरीश चौधरी, नरेंद्र मोटघरे, चंद्रकांत भंड्ग, आनंद श्रीवास्तव, वंदना बेले, संपना दीदी आदि उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रातील अनेक सेवाधारी बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले. शेकडो भाविकांनी यावेळी शांतता आणि सद्भावनेचा मार्ग स्वीकारण्याचा दृढ संकल्प केला.

## ब्रह्माकुमारीज सोलापूर उपक्षेत्राचे ज्येष्ठ सेवाधारी रेवणसिद्धभाईजी यांचे निधन

**अक्षराज : साहेबराव परबत**



**दि.१९, सोलापूर :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, सोलापूर उपक्षेत्राचे वरिष्ठ कुमार, अथक व ऑलराऊंड सेवाधारी आदरणीय रेवणसिद्धभाईजी (वय ७६) यांचे सोमवार, दि.१९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने सोलापूर उपक्षेत्रासह संपूर्ण ब्रह्माकुमारीज परिवारावर शोककळा पसरली असून ईश्वरीय सेवेला मोठी व अपूरणीय हानी झाली आहे. सन १९७५ मध्ये सोलापूर येथे ब्रह्माकुमारीजची ईश्वरीय सेवा सुरू झाली. त्या आरंभकाळापासूनच रेवणसिद्धभाईजी या सेवेशी अत्यंत निष्ठेने जोडले गेले होते. युवावस्थेतच कुमारजीवनाचा स्वीकार करून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य ईश्वरीय सेवेस अर्पण केले. त्याग, सेवा आणि समर्पण हीच त्यांच्या जीवनाची ओळख होती. सोलापूर उपक्षेत्राच्या संचालक आदरणीय सोमप्रभा दिदी, वरिष्ठ राजयोग शिक्षिका नागरत्ना दिदी व महानंदा दिदी यांच्या समवेत त्यांनी सोलापूर, बीड व धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील अनेक शहरांमध्ये ईश्वरीय सेवेचे बीजारोपण केले. केंद्र स्थापन, सेवाविस्तार, जनसंपर्क तसेच व्यवस्थापनाच्या कामात त्यांचे योगदान मोलाचे ठरले. सोलापूर शहरातील विविध क्षेत्रांत कार्यरत मान्यवर, अधिकारी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना ईश्वरीय सेवेच्या समीप आणण्यात रेवणसिद्धभाईजींची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. अत्यंत प्रेमळ व आपुलकीचा स्वभाव, स्नेहपूर्ण व आदरयुक्त व्यवहार, निरहंकारिता आणि शांत वृत्ती ही त्यांची विशेष ओळख होती. वयाने व अनुभवाने ज्येष्ठ असूनही ते नेहमीच साधेपणाने व सेवाभावाने कार्यरत राहत असल्याने ते सर्वांसाठी प्रेरणास्थान होते. महेशनगर, बाळे (ता.सोलापूर) येथे उभारण्यात येत असलेल्या ब्रह्माकुमारीजच्या भव्य 'दीप सरोवर' मिनी रिट्रीट सेंटर प्रकल्पामध्ये देखरेखीसह लहान-मोठ्या सर्व प्रकारच्या सेवा ते अत्यंत तन्मयतेने पार पाडत होते. शेवटच्या क्षणापर्यंत सेवेत सक्रिय राहणे, हे त्यांच्या समर्पित जीवनाचेच द्योतक आहे. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण दैवी परिवारास तीव्र दुःख झाले असून, रेवणसिद्धभाईजी यांचे कार्य, सेवासंस्कार व आदर्श जीवन सदैव स्मरणात राहील, अशी भावना ब्रह्माकुमारीज संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचे अंत्यविधी मंगळवार, दि.२० जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता बाळे येथील लक्ष्मीनगर स्मशानभूमीत होणार आहेत. अशी माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे.

# स्वाभिमानी नाभिक संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी अधिकराव चव्हाण यांची निवड

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१८, पाटण (सातारा) :** पाटण स्वाभिमानी नाभिक संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी अधिकराव चव्हाण यांची एक मताने निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक, राज्याध्यक्ष शंकरराव गायकवाड यांनी नुकतीच घोषणा केली.बोरगाव तालुका सातारा येथील कुबेर छाया मल्टीपर्पस हॉलमध्ये स्वाभिमानी नाभिक संघटनेच्या पदाधिकारी निवडीची बैठक नुकतीच पार पडली.

यामध्ये राज्य कार्यकारणी, पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम संपन्न झाला संघटनेचे संस्थापक, राज्याध्यक्ष शंकरराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली, राज्य कार्यकारणी व पश्चिम महाराष्ट्र, कार्यकारिणीच्या निवडी पार पडल्या. यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अधिकराव चव्हाण, राज्य उपाध्यक्ष प्रदीपराव काशीद, राज्य खजिनदार शिवाजी खामकर, राज्य संपर्कप्रमुख विजय काशीद, राज्य प्रसिद्धीप्रमुख नारायण यादव, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी नवनाथ काशीद, पश्चिम महाराष्ट्र खजिनदार दत्तात्रय तावरे, पश्चिम महाराष्ट्र संघटक, सुनील जाधव, पश्चिम महाराष्ट्र प्रवक्ते कृष्ण जाधव, वरील सर्वांच्या निवड पुढील ५ वर्षा करण्यात केले आहेत.

अधिकराव चव्हाण यांनी यापूर्वी संघटनेच्या तालुका अध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष, या पदावर काम करत असताना संघटनात्मक बांधणीसाठी केलेल्या प्रामाणिक कार्याची व निष्ठेचे दखल घेऊन तसेच पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली असल्याची राज्याध्यक्ष गायकवाड यांनी सांगितले.यावेळी अधिकराव चव्हाण म्हणाले, स्वाभिमानी नाभिक संघटना सर्वसामान्य नाभिक समाजाच्या उन्नतीसाठी काम करणार आहे. समाजातील सामान्य लोकांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने नाभिक समाज बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी कायमच प्रयत्नशील राहणार आहे.

आत्ता पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून काम करत असताना पूर्वीप्रमाणेच ग्रामीण भागात केंद्रबिंदू मानून संघटनात्मक बांधणे तसेच समाजातील प्रश्न सोडून व्यवसायाच्या व समाजातील सर्व घटकांना सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नशील राहण्यास आपण कटिबद्ध असल्याचे तसेच आपण संघटनेमध्ये विविध पदावर काम करत असताना मिळालेला अनुभव याचा समाज उन्नतीसाठी उपयोगात आणून तसेच संघटनेची ध्येय धोरण विचारधारा यांच्याशी बांधील राहून आपण संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन समन्वयाने काम करणार असल्याची ग्वाही देत ग्रामीण भागात संघटना मजबुतीसाठी काम करणार असून स्वाभिमानी नाभिक संघटना ही पक्ष विरहित काम करणारी आहे. संघटनेचे ध्येय धोरणाचे पालन करून समाजाच्या न्याय हक्कासाठी, समाज प्रगतीसाठी, नाभिक समाजातील युवकांना कौशल्य विकासासाठी संघटनेच्या माध्यमातून



काम करणार असून समाज हितासाठी आपण कायम बांधील राहून काम करू असे आश्वासन यावेळी अधिकराव चव्हाण यांनी बोलताना व्यक्त केले.यावेळी राज्य कार्यकारणी, पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी, जिल्हा कार्यकारणी तालुका कार्यकारणी पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.

त्यावेळी मीटिंगसाठी उपस्थित असणारे पदाधिकारी संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष शंकरराव गायकवाड, राज्य सरचिटणीस मंगेशराव काशीद, राज्य महिला सदस्या अनिताताई काशीद, रामभाऊ पवार, सातारा तालुका अध्यक्ष जगन्नाथ पवार, पाटण तालुकाध्यक्ष बाबुराव पवार, कराड दक्षिण तालुकाध्यक्ष अर्जुन सूर्यवंशी, कराड उत्तर तालुका अध्यक्ष गणेश कदम, जिवाजी महाले समितीचे सदस्य संग्राम माने, विष्णू सपकाळ, दाजी सुर्वे, संघटनेचे सर्व पदाधिकारी जिल्ह्यातील सर्व नाभिक समाज बांधव उपस्थित होते. प्रस्ताविक राज्य सरचिटणीस मंगेश काशीद यांनी केले. आभार रामभाऊ पवार यांनी मानले.

# डॉ.प्रवीण गेडाम व डॉ.शैलेश गायकवाड द्वारे लिखित पुस्तकाचे विमोचन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** स्व.आनंदराव गायकवाड बहुउद्देशीय संस्था नागपूर अंतर्गत सामाजिक बांधिलकी फाउंडेशन, नागपूर द्वारे समाजातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणरत्नांचा सन्मान व सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्याची व या कार्याची दखल समाजातील अन्य व्यक्तींनी घ्यावी या हेतूने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. प्रवीण गेडाम लिखित ज्ञान व अभ्यासक्रम, डॉ. शैलेश गायकवाड लिखित शिक्षणाची भरती ओहोटी व डॉ.अरविंद पुनवटकर द्वारे लिखित गृहस्थ जीवनातील बुद्धत्व

या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी प्राध्यापक डॉ.राजश्री मेश्राम आणि प्राध्यापक डॉ. हृषीकेश दलाई, शिक्षणशास्त्र विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांना सत्कारमूर्ती म्हणून गौरविण्यात आले.या समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुरूवर्य, गुणरत्न, छत्रपती शाहू महाराज समाजभूषण, रमाबाई आंबेडकर स्त्री भूषण, पंजाबराव देशमुख कृषीभूषण, गाडगे महाराज सरपंचरत्न, सावित्रीबाई फुले ज्ञानज्योती, महात्मा फुले शिक्षकरत्न पुरस्कार असे एकूण ४४ राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. आयोजन समितीद्वारे पुरस्कार्थींची निवड संपूर्ण महाराष्ट्रातून करण्यात आली होती.




या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राजकुमार अवसरे, संचालक, राज्य विज्ञान संस्था, नागपूर, उद्घाटक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अभ्यासक ज्ञानेश्वर दादा रक्षक. महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, योगेश देवतळे, यांचे शुभहस्ते, डॉ. अजित चुनारकर, प्राध्यापक, मॉरिस कॉलेज, आणि डॉ. शिल्पा सुर्यवंशी, केंद्र प्रमुख, पंचायत समिती, मौदा यांच्या प्रमुख व विशेष उपस्थितीत पार पाडण्यात आला. या प्रसंगी मान्यवरांनी संस्थेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या कार्याचे कौतूक केले.समाजाकरिता आपल्या कार्याचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचे पुरस्कार देवून त्यांना सन्मानित करणे हे आमच्या करिता आनंदाची बाब असल्याचे मत डॉ. शैलेश गायकवाड यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आशाकांत गोंडाणे व प्रवीण गेडाम यांनी तर आभार संस्थेच्या अध्यक्षा संगीता गायकवाड यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिताजिक बांधिलकी फाउंडेशनचा सावित्राबाई फुले यांच्या जयंती निमित्त पुस्तक प्रकाषन राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळास्व.आनंदराव गायकवाड बहुउद्देशीय संस्था, नागपूर अंतर्गत सामाजिक बांधिलकी फाउंडेशन, नागपूर द्वारे समाजातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणरत्नांचा सन्मान व सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्याच्या व या कार्याची दखल समाजातील अन्य व्यक्तींनी घ्यावी.

या हेतूने व संस्थेच्या ध्येय धोरणाच्या अनुषंगाने क्रांतीज्योती सावित्राबाई फुले यांच्या जयंती निमित्त संस्थेचे सचिव डॉ.शैलेश गायकवाड लिखित शिक्षणाची भरती ओहोटी, उपाध्यक्ष डॉ.प्रवीण गेडाम लिखित ज्ञान व अभ्यासक्रम व डॉ.अरविंद पुनवटकर द्वारे लिखित गृहस्थ जीवनातील बुद्धत्व या पुस्तकांचे प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्राध्यापक डॉ.राजश्री मेश्राम आणि प्राध्यापक डॉ.हृषीकेश दलाई, शिक्षणशास्त्र विभाग, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांना सत्कारमूर्ती म्हणून गौरविण्यात आले.

या समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय गुरूवर्य, राज्यस्तरीय गुणरत्न, छत्रपती शाहू महाराज राज्यस्तरीय समाजभूषण, रमाबाई आंबेडकर राज्यस्तरीय स्त्रीभूषण, पंजाबराव देशमुख राज्यस्तरीय कृषीभूषण, गाडगे महाराज राज्यस्तरीय सरपंचरत्न, सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय ज्ञानज्योती, महात्मा फुले राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार असे एकूण ४४ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

आयोजन समितीद्वारे पुरस्कार्थींची निवड संपूर्ण महाराष्ट्रातून करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजकुमार अवसरे, संचालक, राज्य विज्ञान संस्था, नागपूर, उद्घाटक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अभ्यासक ज्ञानेश्वर दादा रक्षक. महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, योगेश देवतळे, यांचे शुभहस्ते डॉ.अजित चुनारकर, प्राध्यापक, मॉरिस कॉलेज, आणि डॉ.शिल्पा सुर्यवंशी, केंद्र प्रमुख, पंचायत समिती, मौदा यांच्या प्रमुख व विशेष उपस्थितीत पार पाडण्यात आला.

या प्रसंगी मान्यवरांनी संस्थेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या कार्याचे कौतूक केले.डॉ.शैलेश गायकवाड यांनी सामाजिक बांधिलकी फाउंडेशन द्वारे कोरोना काळात केलेल्या व सद्यस्थितीत करीत असलेल्या कार्याचा आढावा आपल्या प्रास्ताविकातून मांडला समाजाकरिता आपल्या कार्याचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचे पुरस्कार देवून त्यांना सन्मानित करणे हे आमच्या करिता आनंदाची बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आशाकांत गोंडाणे यांनी तर आभार संस्थेच्या अध्यक्षा संगीता गायकवाड यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिल्पा गेडाम, सुषमा नगराळे, आकाश बेले, प्रतीक डूले, अमोल वाघमारे, रश्मी धोंगडे, वैष्णवी खडोदे, सायली भारती, हिमानी हेमणे, मोनिका धोटे , देवयानी खंदाहार, अनिश्का अधिरा, अतुल गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.